"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"- कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
# श्रीरामपूर जि. अहमदनगर



५५ वी

## पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील
## राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा-२०१७

प्रति,

मा. प्राचार्य यांना

स. न. वि. वि

महोदय,

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ ती. आण्णा यांचे जयंती निमित्ताने आमच्या महाविद्यालयात बुधवार दि.२०/०९/२०१७ रोजी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने महाविद्यालयीन युवक – युवतींमध्ये वक्तृत्व कलेचे संवर्धन होऊन व्यक्तिमत्त्व विकासाला संधी मिळते. कर्मवीरांचे विचार, कार्य, त्याग, समर्पण व दीन दुबळ्यांच्या शिक्षणाविषयीची तळमळ यांचे स्मरण केले जाते. वैचारिक मंथनातून कर्मवीरांच्या कार्याचा आदर्श घेऊन नवीन शैक्षणिक उपक्रम सुरु केले जातात.

कृपया आपल्या महाविद्यालयातील सूचना फलकावर वक्तृत्व स्पर्धेचे निमंत्रण प्रसिध्द् करुन संघ पाठविणे विषयी सविनय विनंती आहे.

❊ आपले नम्र ❊

**प्रा. बापूसाहेब घोडके**
समन्वयक, वक्तृत्व स्पर्धा
मोबाईल : ९९७५०६२२००

**डॉ.एल.डी.भोर**
प्राचार्य
सी. डी. जैन. कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

## स्पर्धेचे विषय

**विषय (अ.गट)**

१. आरक्षण : समताधिष्ठित समाज निर्माण करु शकेल?
२. शेतकऱ्यांना कर्जमाफी की हमीभाव हवा?
३. सोशल मिडीया : प्रबोधन की मोहजाल?
४. वस्तू व सेवा कर (GST) : एक देश एक कर

**विषय (ब.गट)**

१. कर्मवीरांचे शैक्षणिक तत्वज्ञान
२. रयत माऊली कै. ती. सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील
३. स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य हीच माझी चतु:सूत्री– कर्मवीर
४. समाज परिवर्तनात रयत शिक्षण संस्थेचे योगदान

## रयत शिक्षण संस्था,सातारा

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागातील मागासलेपणाचे कारण अविद्येत शोधले होते . शेतकरी, कष्टकरी, दीनदलितांच्या उद्‌धारासाठी दर्जेदार शिक्षणाची व्यवस्था व्हावी असे आण्णांनी मनोमन जाणले आणि काले, तालुका कराड, जिल्हा सातारा येथे ४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. प्रशासकीय सोयीसाठी १९२४ मध्ये संस्थेचे मुख्यालय सातारा येथे स्थलांतरीत करण्यात आले. दुर्गम भागातील वाड्या, वस्त्या व गावातील विद्यार्थी डोळयांसमोर ठेवून कर्मवीर आण्णांनी विद्यालयांची स्थापना केली.

आज रयतची ४२ महाविद्यालये, ४३९ हायस्कूल, ८ डी.एड कॉलेजेस, २६ प्राथमिक शाळा, १६ बालवाड्या , ७१ वसतिगृह, ८ आश्रमशाळा आणि ६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून ४ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १९००० संस्थानिष्ठ सेवकांच्या मदतीने रयत शिक्षण संस्था ज्ञानदानाच्या पवित्र क्षेत्रात कार्यरत आहे. महाराष्ट्रातील १४ व कर्नाटकातील १ अशा एकूण १५ जिल्ह्यांमध्ये संस्थेचे शैक्षणिक कार्य अविरतपणे सुरु आहे. केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर राष्ट्रीय शैक्षणिक नकाशावर रयत शिक्षण संस्थेने मानाचे स्थान मिळविले आहे.

## चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर.

जून १९६२ मध्ये हे महाविद्यालय सुरु झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागात स्वतंत्र वाणिज्य विद्याशाखा असलेले हे एकमेव महाविद्यालय आहे. ११ वी ते एम.कॉम., एम.फिल, पीएच.डी., पी.जी.डी.बी. एम. आणि बी.सी.ए. पर्यंत दर्जेदार शिक्षणाची सुविधा येथे उपलब्ध आहे. येथील अनेक विद्यार्थी सी.ए., सी.एस., सी.डब्ल्यू.ए. झालेले असून बहुराष्ट्रीय कंपन्या, बँका, व्यापारी आस्थापना, विमा व सेवा क्षेत्रात मोठ्या संख्येने निवडले जातात. कला, क्रीडा क्षेत्रात देखील हे महाविद्यालय सदैव आघाडीवर असते. महाराष्ट्रातील अनेक नामवंत कला, क्रीडा व वक्तृत्व स्पर्धांमध्ये येथील विद्यार्थी चमकले आहेत.

कर्मवीर जयंती निमित्ताने येथील वक्तृत्व स्पर्धा गेल्या ५४ वर्षापासून सुरु असून दरवर्षी या स्पर्धेला वाढता प्रतिसाद मिळतो आहे. या वक्तृत्व स्पर्धेच्या निमित्ताने महाविद्यालयीन युवकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीवर आपली मते मांडता येतात. कर्मवीर आण्णा व रयत माऊली कै.ती.सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रातील विचार, कार्य, त्याग व समर्पणाचे स्मरण केले जाते. वक्तृत्व स्पर्धेमधून व्यक्त झालेल्या वैचारिक धनाने विद्यार्थी विकसित होतात. व्यक्तिमत्त्व खुलविण्याला नवनवीन मार्ग सापडतात. जीवन समृध्दीकडे विद्यार्थ्यांची वाटचाल सुरु होते.

**वक्तृत्व स्पर्धेसाठी आपणास हार्दिक निमंत्रण !**

## स्पर्धेची माहिती व नियमावली

१. महाराष्ट्रातील कोणत्याही ज्युनि. किंवा सिनी. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल. प्रत्येक महाविद्यालयास वक्तृत्व स्पर्धेसाठी जास्तीत जास्त दोनच स्पर्धक पाठविता येतील. अ गटातील एक आणि ब गटातील एक असे दोन विषय स्पर्धकांना घ्यावे लागतील.
२. स्पर्धेचे शुल्क रुपये १५०/- राहील. हे प्रवेश शुल्क परत केले जाणार नाही.
३. पूर्ण भरलेल्या प्रवेशिका दि.१७/०९/२०१७ पर्यंत मिळतील अशा पध्दतीने पाठवाव्यात.
४. स्पर्धकांची निवास व भोजनाची व्यवस्था केली जाईल. मुक्कामी येणाऱ्या स्पर्धकांनी पूर्व कल्पना द्यावी.
५. सर्व भाषणे मराठीतून होतील.
६. प्रत्येक स्पर्धकास स्पर्धेसाठी ८ मिनिटे (६+२) वेळ दिला जाईल.
७. स्पर्धा बुधवार दि.२० सप्टेंबर २०१७ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता सुरु होईल.
८. स्पर्धकांच्या भाषणाची क्रमवारी स्पर्धा सुरु होण्यापूर्वी जाहीर केली जाईल.
९. प्रत्येक स्पर्धकाजवळ सन -२०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षाचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.
१०. परिक्षक मंडळाचा निर्णय अंतिम असेल व तो सर्व स्पर्धकांना बंधनकारक राहील.
११. वरील सर्व नियमांमध्ये ऐनवेळी बदल करण्याचे अधिकार मा. प्राचार्यांनी राखून ठेवले आहेत.

## पारितोषिके

| | | | |
|---|---|---|---|
| १. प्रथम क्रमांक | - | रु. | ५००१/- |
| २. व्दितीय क्रमांक | - | रु. | ४००१/- |
| ३. तृतीय क्रमांक | - | रु. | ३००१/- |
| ४. उत्तेजनार्थ तीन क्रमांक | - | रु. | १००१/- |



श्री.स्वामी समर्थ प्रिंटर्स-९८२२२४१६११